महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातील शिपाई, गट-ड संवर्गातील पद पुनर्जीवित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग
शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४३७/आस्था.
१८ वा मजला, नविन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: २३ नोव्हेंबर, २०२६

वाचा :-

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.अकंपा-१२२५/प्र. क्र. १२१/मलोआ, दिनांक १७.०७.२०२५.
२) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्र. आस्थाप-२०२४/प्र.क्र.१०१/आस्थापना, दि.२९.०१.२०२६,
३) प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.मप्रनि/आस्था/E-३३४९८५९, दि.०५.०८.२०२६

प्रस्तावना :-

पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळात कार्यरत असलेल्या पदांचा आढावा घेवून मंडळाचा सुधारित आकृतीबंध दिनांक २९ जानेवारी, २०२५ अन्वये मंजूर करण्यात आला आहे. सुधारित आकृतीबंधानुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातील शिपाई गट-ड संवर्ग हा "मृत संवर्ग" म्हणून घोषित करण्यात आला आहे. सामान्य प्रशासन विभागाने दि.१७.०७.२०२५ च्या शासन निर्णय अन्वये, अनुकंपा नियुक्तीचे सर्वसमावेशक धोरण निश्चित केले आहे. शासन निर्णय, दि.१७.०७.२०२५ मधील परिच्छेद (१) (viii) (ब) मधील तरतूदीनुसार "गट-ड मधील जेवढी पदसंख्या मृत घोषित केली आहे, त्या पदसंख्येच्या मर्यादेत अनुकंपा नियुक्तीसाठी पदे पुनर्जीवित करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागास देण्यात आले आहेत.

त्याअनुषगाने प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी सुधारित आकृतिबंधानुसार मृत ठरविलेल्या शिपाई गट-ड संवर्गातील १ पद पुनर्जीवित करण्याची विनंती केली आहे. सदर विनंतीनुसार संदर्भीय क्र.२ अन्वये प्रदुषण नियंत्रण मंडळातील मृत ठरविलेल्या गट-ड संवर्गात शिपाई पदी अनुकंपा नियुक्तीच्या यादीत समाविष्ट करण्यास उमेदवार पात्र असल्याची बाबत विचारात घेवून, अनुकंपा नियुक्तीसाठी १ पद पुनर्जीवित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या अधिनस्त गट 'ड' शिपाई संवर्गातील अनुकंपातत्वारील प्रतिक्षासूचीमध्ये समाविष्ट करण्यास पात्र असलेल्या उमेदवाराच्या नियुक्तीकरीता संदर्भ क्र. १ येथील दि.१७.०७.२०२५ रोजीच्या शासन निर्णयामधील परिच्छेद (१) (viii) (ब) नुसार गट 'ड' संवर्गातील १ पद अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी खालील अटी व शर्तीना अधिन राहून पुनर्जीवित करण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

१) गट-ड च्या पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्ती केलेला कर्मचारी हा पदोन्नत झाल्यामुळे अथवा सेवानिवृत्त झाल्यामुळे अथवा इतर कारणामुळे हे पद रिक्त झाल्यास सदर पद आपोआप व्यपगत होईल.

२) सदर नियुक्तीस सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र अकंपा-१२२५/प्र. क्र. १२१/म.लो.आ., दि.१७.०७.२०२५ मधील गट-ड संवर्गाकरीता असणाऱ्या सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

२. उपरोक्त पद पुनर्जीवीत करण्याच्या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने करावी.

३. सदर शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक अकंपा-१२२५/ प्र.क्र.१२१/म.लो.आ. दिनांक १७.०७.२०२५ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित्त करण्यात येत आहे.

४ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६११२३१३३१२१६१०४ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्ममित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHAHEEN SWALI SHAIKH

Digitally signed by SHAHEEN SWALI SHAIKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=ENVIRONMENT AND CLIMATE CHANGE, 2.5.4.20=9511E997A3875EDBD0967FA4CEEC8AC31B688631DE1C7A35E19DC30961F0438D, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=856C57BEF6C4D3EF93F04760CAD099503CA65FCA1896CF77AC80CEFD468D30EA, cn=SHAHEEN SWALI SHAIKH
Date: 2026.11.23 13:32:18 +05'30'

(शाहीन शेख)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषन नियंत्रण मंडळ, मुंबई
२. महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
३. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
४. सह सचिव/उपसचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
७.निवडनस्ती/आस्थापना, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई